## डॉ. बेंडाळे महिला महाविद्यालयाच्या ०६ विद्यार्थिनी विद्यापीठ गुणवत्ता यादीत

जळगाव : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने एप्रिल २०१७ मध्ये घेतलेल्या परिक्षांचा निकाल जाहिर झाला असून मानव्य, वाणिज्य व व्यवस्थापन, आंतरविद्याशाखा अभ्यास आणि विज्ञान व तंत्रज्ञन या चारही विद्याशाखांमध्ये जळगाव येथील डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाच्या ०६ विद्यार्थिनींनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. विशेष अभिनंदनीय बाब म्हणजे बी. सी. ए. मध्ये तसेच एम. ए. अर्थशास्त्रामध्ये ०२ विद्यार्थिनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठस्तरावर प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदकाच्या मानकरी ठरल्या आहेत.

**बी. ए. मराठीला** आशा हिरालाल बारी हिने १२०० पैकी ९६१ गुण मिळवून दुसरा क्रमांक मिळविला. **बी. एस्सी. संगणकशास्त्र** विषयात पाटील दर्शना श्रीराम हिने १९०० पैकी १६४७ गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. **बी. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स** विषयात शुभांगी विनेष देशमुख हिने १९०० पैकी १५६५ गुण मिळवून दुसरा क्रमांक प्राप्त केला. **बी. कॉम.** या परिक्षेत ज्योती एकनाथ कोल्हे या विद्यार्थिनीने २८०० पैकी २२०० गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

**बी. सी. ए.** ला चोपडे काजल गोविंदा या विद्यार्थिनीने २८०० पैकी २४०३ गुण मिळवून प्रथम स्थान पटकावले तर **एम. ए. अर्थशास्त्र** विषयात बिऱ्हाडे वर्षा मोहन हिने १६०० पैकी १२७१ गुंण पटकावून पहिला क्रमांक मिळविला. या सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष चौधरी, सचिव प्रा. एन. एस. पाटील,लेवा एज्युकेशनल युनियन संस्थेचे सर्व संचालक मंडळ आणि प्राचार्य डॉ. एस. एस. राणे आणि सर्व प्राध्यापक बंधू भगिनींनी अभिनंदन केले आहे.

---

दिनांक : १५/१२/२०१७